१.१२ संबंधित विद्यापीठांचे कुलगुरु विद्यापीठ स्तरावर आवश्यक तेवढया तज्ञ समिती गठीत करतील. सदर तज्ञ समितीमध्ये छाननी समितीच्या सदस्यांचा अंतर्भाव असणार नाही. सदर तज्ञ समितीने १५ जानेवारी पर्यंत प्रत्यक्ष भेटी देवून नवीन महाविद्यालयांसाठी संबंधित संस्थांची सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट 'क' मध्ये विहित करण्यात आलेल्या सूचीनूसार तयारी आहे किंवा कसे याबाबत परिक्षण करुन त्यांचा अहवाल १५ फेब्रुवारी पर्यंत संचालक, बी.सी.यु.डी. मार्फत कुलगुरुंना सादर करण्यात येईल. सदर पायाभूत सोयीसुविधा पुर्ण न करणा-या संस्थांची शिफारस विद्यापीठ करणार नाही. तथापि, ज्या जिल्हयांमध्ये महाविद्यालयीन शिक्षणात ढोबळ पटसंख्या प्रमाण (Gross enrollment Ratio) राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे. अशा जिल्हयांच्या बाबतीत, तसेच नक्षलग्रस्त, आदिवासी, डोंगराळ/ दुर्गम भागातील महाविद्यालयांच्या बाबतीत परिशिष्ट 'क' मधील अनुक्रमांक ४, ६,७,८,१०,११, १२ व १३ येथील सुविधा काही प्रमाणात असल्या तरी त्यांची शिफारस करता येईल.

१. १३. कुलगुरुंकडून संबंधित पात्र संस्थांना २५ फेब्रुवारी पर्यंत पात्रता व अपात्रता कळविण्यात येईल.

१. १४ सदर पात्रता ही एक वर्षासाठी वैध राहिल.

१. १५. अपात्रता कळविलेल्या संस्था १५ मार्च पर्यंत त्याविरुध्द विद्यापीठाकडे अपिल दाखल करु शकतील. सदर अपिलावर (गरजेनुसार तज्ञ समिती पाठवून अहवाल घेऊन) १५ एप्रिल पर्यंत कुलगुरु निर्णय देतील.

१. १६. सर्व पात्र अर्जदार संस्थांचे अर्ज मंजूरीच्या शिफारशीसह विद्यापीठाकडून शासनाकडे दिनांक १ मे पर्यंत सादर करण्यात येतील.

१. १७. विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर शासनाकडून १५ जून पर्यंत परवानगी कळविण्यात येईल.

२.	महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ८२ (४) मध्ये विद्यापीठाने शिफारशीसह प्रस्ताव शासनास सादर करण्याचा दिनांक डिसेंबर महिन्याचा शेवटचा दिवस अशी तरतूद आहे. सदर कलमामध्ये आवश्यक ती सुधारणा स्वतंत्रपणे करण्यात येत आहे.

३.	महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ८२ (५) मधील दुसऱ्या परंतुकामध्ये नवीन महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्याची तारीख १५ जूलै अशी आहे ती १५ जून अशी करण्याची सुधारणा स्वतंत्रपणे करण्यात येत आहे.

४.	सर्व विद्यापीठांनी पाच वर्षाचा बृहत आराखडा करावा. त्यामध्ये ज्या जिल्हयामध्ये महाविद्यालयीन शिक्षणात ढोबळ पटसंख्या प्रमाण (जीईआर) राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे असे जिल्हे, नक्षलग्रस्त, आदिवासी, डोंगराळ/दुर्गम भागासाठी सर्वोच्च प्राथम्य दयावे व त्या प्राथम्यक्रमानूसार व तद्नंतर सर्वसाधारण याप्रमाणे त्या त्या शैक्षणिक वर्षासाठी विशिष्ट एवढीच महाविद्यालये (व्यावसायीक (AICTE व NCTE मंजूरी देत असलेले अभ्यासक्रम सोडून सर्व ) व पारंपारिक) मंजूरीच्या प्रस्तावांची शिफारस करावी.

५.	नवीन विद्याशाखा व नवीन पाठयक्रम सुरु करण्यासंबंधीच्या परवानगीच्या अर्जासंबंधीही जरी मूळ महाविद्यालये मंजूर असली तरी वरील १.१ ते १.१७ प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

६.	नवीन विषय व वाढीव तुकडया मंजूरीच्या संदर्भात महाराष्ट्र विद्यापीठ कायदा कलम ८३ (५) अन्वये परवागीची कार्यपध्दती राज्य शासनाने विहीत करायची असून ती वरील ५ प्रमाणे विहीत करण्यात येत आहे.

७.	ज्या संस्था, वरीलप्रमाणे नवीन महाविद्यालये, विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय व वाढीव तुकडया मंजूरीसाठी अर्ज सादर करतील व ज्यांची यापूर्वीच महाविद्यालये अस्तित्वात आहेत, त्यांचेबाबतीत पुढील पूर्तता नसलेल्या संस्थांचे अर्ज शासनाकडे शिफारस करु नयेत.

७.१. पात्र महाविद्यालयाचे बाबतीत नॅक/ एनबीए कडून मानांकन व मूल्यांकन तसेच पुनर्मानांकन करुन घेतले नसेल तर ;

७.२. ज्या संस्थांच्या महाविद्यालयातील प्राचार्यासहित सर्व अध्यापकांची पदे अर्हताधारक व पात्र उमेदवारामधून नियमितरित्या भरलेली नसतील तर.

८.	वरील परि. १.७ मध्ये विहित केलेली पडताळणी समिती व परि. १.१२ मध्ये विहित केलेली तज्ञ समिती यांची संख्या ती ती विद्यापीठे त्या त्या वर्षी सुरु करावयाच्या महाविद्यालय (पारंपारिक व व्यावसायीक), विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय व तुकडी वाढ यांची व्याप्ती विचारात घेवून ठरवतील व विहित केलेल्या वेळापत्रकात काम होईल याची खातरजमा करतील.

९.	विद्यापीठांनी शासनाकडे प्रस्ताव पाठवितांना त्यात नवीन पारंपारिक / व्यावसायिक महाविद्यालये, अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात अतिरिक्त विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय व वाढीव तुकडया असे वर्गीकरण केलेले असेल.

१०. प्रस्ताव मागवितांना ते फक्त DVB-TTSurekh या फॉन्टमध्येच घेतले जावेत व त्याच फॉन्ट मध्ये शासनास सादर करावेत.

हे आदेश, राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१०११०४१४४८४०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(सदाशिव शिवदास)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय सहसंचालक, महाराष्ट्र राज्य
सर्व कुलसचिव, अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
मशि / विशि तील सर्व कार्यासने, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
निवडनस्ती मशि ४

## परिशिष्ट 'अ'

## अर्जाचा नमूना

| | | |
|---|---|---|
| १. | संस्थेचे नांव व पूर्ण पत्ताः (दूरध्वनी क्रमांकासह) | |
| २. | प्रस्तावित महाविद्यालयाचे नांव आणि पूर्ण पत्ताः | |
| ३. | महाविद्यालय जेथे सुरु करावयाचे आहे त्या ठिकाणाची लोकसंख्याः | |
| ४. | प्रस्तावित महाविद्यालय सुरु करावयाचे सत्रः | |

| | | | ✓ | विषय | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ५. | अस्तीत्वात असलेल्या महाविद्यालयात नवीन विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय, वाढीव तुकडया सुरु करायचे असल्यास त्याचा तपशिल | विद्याशाखा | | | |
| | | अभ्यासक्रम | | | |
| | | विषय | | | |
| | | तुकडया | | | |
| | | | | | |

६. आवेदन शुल्क रुपये ----------------------/-, धनाकर्ष क्र. ------------------------------
दिनांक --------------------
बँकेचे नांव ----------------------------------------------------------
(धनाकर्ष कुलसचिव, ---------------------------------------- विद्यापीठ, यांचे नांवे असावा.)

७. महाविद्यालय सुरु करावयाच्या अभ्यासक्रमाचा तपशील

| अ.क्र. | शाखा | अभ्यासक्रम | अध्यापनाचे माध्यम | अध्यापनाचे विषय |
|---|---|---|---|---|
| | | | | |

८. संस्थेच्या पंजीयनाचा क्रमांक व दिनांक

९. संस्थेच्या संविधानात शैक्षणिक बाबीसंबंधी तरतूद असल्यास त्या तरतूदीच्या कलम क्र. व तदनुसार नवीन महाविद्यालय, विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय, वाढीव तुकडी सुरु करण्यासंबंधीचा संस्थेचा ठराव क्र. व दिनांक

१०. (अ) प्रस्तावित महाविद्यालय सुरु करणार असलेले विद्याशाखा, अभ्यासक्रम व विषय हे प्रस्तावित महाविद्यालयाच्या १५ कि.मी. परिसरातील इतर महाविद्यालयात शिकवीले जात असल्यास त्या महाविद्यालयांच्या नावासह तपशील: ------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------
(जागा कमी पडल्यास स्वतंत्र वेगळ्या कागदावर पुरविण्यात यावी.)

११. आपण सुरु करणार असलेल्या विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय, वाढीव तुकडयामुळे व उल्लेखित परिसरातील इतर महाविद्यालयांशी अवास्तव स्पर्धा निर्माण होईल काय ?------------------------
-------------

| | |
|---|---|
| १२. | निरनिराळ्या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षात प्रवेशच्छुक विद्यार्थ्यांची अंदाजित संख्या |

| कला | वाणिज्य | विज्ञान | विधी | इतर |
|---|---|---|---|---|
| | | | | |

१३. १५ कि.मी. परिसरातील अस्तित्वात असलेल्या उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची मागिल तीन वर्षांची पुढील संदर्भात माहिती द्यावी.

| अ.क्र. | शाळेचे / कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव व पत्ता | वर्ष | उच्च माध्यमिक परिक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या | उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

१४. कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय ज्या ठिकाणी उघडावयाचे आहे ते ठिकाण १२ वी च्या परिक्षेचे केंद्र आहे काय ? --------------------------------

१५. केंद्र असल्यास तेथून १२ वी च्या मार्च व ऑक्टोबरच्या परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची कला, वाणिज्य, विज्ञान शाखा निहाय संख्या--------------------------------------------------------------

१६. अ) संस्थेद्वारा चालविल्या जाणा-या शाळा व महाविद्यालये यांचा तपशील ---------------

ब) सदर शाळा व महाविद्यालयांची मान्य प्रवेश क्षमता, प्रत्यक्ष प्रवेशित व परिक्षेस बसलेले विद्यार्थी-- -----------------------------------------------------

१७. अ) महाविद्यालयासाठी वापरल्या जावयाच्या इमारतीच्या खोल्यांची संख्या व आकार--------------ब) सदर इमारत खोल्यामध्ये सध्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक किंवा इतर अभ्यासक्रमाचे वर्ग भरतात काय? ----------------------

असल्यास त्याचा तपशिल ------------------

१८. अर्ज केलेल्या वर्षातील ३१ मार्च ला असलेली संस्थेची आर्थिक स्थिती:-

(अ) स्थावर मालमत्ता----------------------------------------------

(ब) जंगम मालमत्ता --------------------------------------------

(क) बँकेतील रोख--------------------------------------------------

(ड) बँकेचे वा इतर कर्ज -------------------------------------------

१९. वरील उल्लेखीत बाबीशिवाय महाविद्यालयाच्या आकस्मिक व अनाकस्मिक खर्चासाठी करण्यात येणा-या आर्थिक तरतूदीचा तपशील:------------------------------------------------------------ ------------------------------

| | |
|---|---|
| मुळ सही (शिक्क्याची नाही)<br>अध्यक्ष<br>(संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता) | मुळ सही (शिक्क्याची नाही)<br>सचिव<br>(संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता) |

| अ.क्र. | संस्थेचे नांव व पूर्ण पत्ता | प्रस्तावित महाविद्यालयाचे नाव व विद्याशाखा | विद्यापीठाच्या बृहत आराखड्यातील विवक्षित ठिकाण | विद्यापीठाने केलेली शिफारस | संस्थेने महाविद्यालया साठी आवश्यक विद्यापीठ अनुदान आयोगाने विहीत केलेल्या मूलभूत सुविधा उपलब्ध केल्या आहेत काय ? असल्यास त्याचा तपशिल | संस्थेची आर्थिक स्थिती कशी आहे | ज्या तालुक्यामध्ये महाविद्यालय मागितले आहे तिथे किती महाविद्यालये आहेत व तालुक्यातील महाविद्यालयावर विपरित परिमाण होईल किंवा कसे | तालुक्यामध्ये अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांची नांवे व महाविद्यालयांमधील अंतर | तालुक्यामध्ये अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांतील शिकविल्या जाणा-या विद्याशाखा व त्यातील विद्यार्थी संख्या | तालुक्यामध्ये अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांतील विद्याशाखे अंतर्गत शिकविल्या जाणा-या विषयांचे गट (व्यावसायीक अभ्यासक्रमांची स्वतंत्र माहिती दयावी) | गटनिहाय विद्यार्थी संख्या (व्यावसायीक अभ्यासक्रमांची स्वतंत्र माहिती दयावी) | तालुक्यामध्ये महाविद्यालय/ शाळांमधून १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्याशाखानिहाय विद्यार्थ्यांची संख्या | मागिल वर्षी किती विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिले | नवीन महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी द्यावी किंवा कसे याबाबतचे विद्यापीठाचे स्वयंस्पष्ट अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | | ३. | ४. | ५. | ६. | ७ | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. |
| | | | | | १.<br>२.<br>३.<br>४.<br>५.<br>६.<br>७.<br>८.<br>९.<br>१०.<br>११.<br>१२. | | | | | | | | | |

सूचना : संस्थेने रकाना क्र. ४,५ व १५ सोडून इतर माहिती अचूक भरावी. त्यातील चूकांची जबाबदारी संस्थेची राहील.

मुळ सही (शिक्क्याची नाही)
अध्यक्ष
(संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता)

मुळ सही (शिक्क्याची नाही)
सचिव
(संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता)

# परिशिष्ट 'ब'

## अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांची सूची

१) संस्थेचा नवीन महाविद्यालय मंजूरीसाठीचा विहित नमुन्यात अर्ज

२) संस्था नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत.

३) अर्जासोबत संस्थेच्या घटनेची साक्षांकित प्रत.

४) अर्जासोबत संस्थेचा मागील वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाची प्रत.

५) किमान रु. ५,००,०००/- चे फिक्स डिपॉजिटची प्रमाणित प्रत.

६) संस्था / महाविद्यालये चालविण्याची अनुभवाची कागदपत्रे.

७) परिसरातील विद्यार्थ्यांच्या अनुषंगाने महाविद्यालयाची गरज (समर्थन).

८) अर्जासोबत चालू वर्षाच्या तपशिलवार अंदाजपत्रकाची प्रत.

९) संबंधीत संस्थेचे आर्थिक व्यवहार राष्ट्रीयकृत / शेड्युल बँकेमार्फत केले जात असल्याचे कागदपत्र.

१०) अर्जासोबत संबंधित संस्थेने संबंधित राष्ट्रीयकृत / शेड्युल बँकेमध्ये ठेवलेला ठेव निधी विद्यापीठाच्या पूर्व परवानगी शिवाय न काढण्याबाबतचे संबंधित राष्ट्रीयकृत बँकेचे व संस्थेचे संयुक्त आश्वासन पत्र.

११) शासनाचे कायम विना अनुदानित धोरण लक्षात घेता अर्जासोबत महाविद्यालयाचा नियमानुसार वेतन व वेतनेतर खर्च संस्था करणार असल्याबाबतचे रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र.

## परिशिष्ट 'क'

## तपासणी सूची

१) संस्थेकडे महानगर परिसरात २ एकर व इतर शहरात ५ एकर जागा.

२) जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी दस्तऐवजाची साक्षांकित प्रत / भाडेतत्वावर असल्यास नोंदणीकृत करार पत्राची प्रत.

३) महाविद्यालयाची मागणी करण्यापूर्वी संस्थेच्या नोंदणीस किमान एक वर्ष पूर्ण झाले असल्याचे कागदपत्र / दस्ताऐवज.

४) प्रस्तावित महाविद्यालयाच्या इमारतीत विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केल्यानुसार सेमीनार रुम, लेक्चर रुम, लायब्ररी, प्रयोगशाळा यासाठी किमान आवश्यक जागा.

५) प्रस्तावित महाविद्यालयाच्या इमारतीमध्ये पाणी, वीज, स्वच्छतागृह, गटार लाईन इत्यादीची सोय.

६) महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेत निर्धारित आवश्यक सामग्री (किमान १ लाख रुपये प्रत्येक विषयासाठी राखीव )

७) ग्रंथालयात पुस्तकांची सूविधा (किमान ५०० पुस्तक )

८) प्रस्तावित महाविद्यालयात विद्यार्थ्यांना खेळण्याची सोय, कॅन्टीन, हेल्थ केअर सुविधा.

९) संबंधीत संस्था प्रस्तावित महाविद्यालयासाठी क्रिडांगण भाड्याने वापरणार असल्यास अर्जासोबत रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत भाडे कराराची साक्षांकीत प्रत.

१०) अध्यापकांकरीता व विद्यार्थीनींकरीता स्वतंत्र कॉमन रुम.

११) मुला मुलींकरीता परिसरात किमान २० टक्के (क्षमता) राहण्याची सोय असल्याचे पुरावे.

१२) प्रस्तावित महाविद्यालयाच्या इमारतीतील सेमिनार रुम, लेक्चर रुम, फॅकल्टी रुम, स्टाफ रुम, प्राचार्यांची रुम, कॉमन रुम, होस्टेल रुम, इत्यादी ठिकाणी आवश्यक फर्निचर.

१३) महाविद्यालयाच्या परिसरात प्राचार्यांचे निवास स्थान / भाडेतत्वावर घेणार असल्याचे कागदपत्र.

१४) प्रस्तावित महाविद्यालयास प्रथम संलग्नीकरण मिळाल्यापासून ५ वर्षामध्ये महाविद्यालय ज्या ठिकाणासाठी मंजूर झाले आहे या ठिकाणी स्वत:चे इमारतीमध्ये महाविद्यालय स्थलांतरीत करत असल्याबाबतचे हमीपत्र.

१५) शासन निर्णय क्रमांक एनजीसी/२००९/(३०१/०९)/मशि-४, दि. २५/९/२००९ अन्वये ज्या संस्थेची यापूर्वीचे महाविद्यालये अस्तित्वात आहेत अशा संस्थेने नवीन महाविद्यालयाची मागणी केल्यास पूर्वीच्या महाविद्यालयाचे नॅक / एनबीए मुल्यांकन अथवा पुनर्मुल्यांकन असणे आवश्यक आहे, किंवा किमान अर्ज केलेला असावा.

**सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालये (व्यावसायिक व पारंपारिक), विद्याशाखा, अभ्यासक्रम/ विषय व वाढीव तुकडयांना मंजूरी देण्यासाठी कार्यपध्दती व निकष विहित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः एनजीसी २०१२/(२४७/१२)/ मशि ४**

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २ सप्टेंबर, २०१३

**वाचा -**

१) **शासन निर्णय क्रमांकः एनजीसी २०१०/ (१९३/१०)/ मशि- ४, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१०.**

२) **शासन निर्णय क्रमांकः एनजीसी २०११/ (२४०/११)/ मशि- ४, दिनांक २५ ऑक्टोबर, २०११.**

**शासन निर्णय -**

नवीन महाविद्यालये (व्यावसायिक व पारंपारिक), विद्याशाखा, अभ्यासक्रम / विषय व वाढीव तुकडयांना मंजूरी देण्यासाठी दि. ३०.१०.२०१० च्या शासन निर्णयाद्वारे निकष विहित करण्यात आलेले आहेत. त्या निकषात शासन निर्णय दि. २५.१०.२०११ अन्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत. यात महाविद्यालयासाठी जागेबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या निकषांचा विचार करण्यात आलेला आहे.

२. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून नवीन महाविद्यालये (व्यावसायिक व पारंपारिक ), विद्याशाखा, अभ्यासक्रम / विषय व वाढीव तुकडयांना मंजूरी देण्यासाठी परिशिष्ट 'ब' मधील अनुक्रमांक १२ व १३ मध्ये नमुद केलेल्या सुधारित निकषांसह अर्ज मागविण्याची कार्यपध्दती व निकषांबाबत खालीलप्रमाणे शासनाने निर्णय घेतला आहे.

१. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ८२ (३) मधील तरतूदीनूसार सर्व अकृषि विद्यापीठांनी बृहत आराखडयातील ठिकाणासह वृत्तपत्रात जाहिरात देवून अर्ज मागवावेत. बृहत आराखडया बाहेरच्या ठिकाणासाठी व अभ्यासक्रमासाठी अर्ज स्विकारले जाणार नाहीत असा स्पष्ट उल्लेख जाहिरातीत करण्यात यावा व तसे स्विकारु नयेत.
२. सदर अर्ज दि. ३० ऑक्टोबर, २०१० च्या शासन निर्णयातील परिशिष्ट “अ” मधील अर्जाच्या नमून्यातच मागवावेत.
३. विद्यापीठांनी महाविद्यालयाकडून मान्यतेबाबतचे अर्ज मागवितांना इलेक्ट्रॉनिक पध्दतीने म्हणजेच व्ही.सी.डी. वर व नेहमीच्या पध्दतीने Hard Copy वर विद्यापीठांकडे सादर करण्याबाबतच्या सूचना जाहिरातीत देण्यात याव्यात. त्यामध्ये संस्थांमध्ये असलेल्या सोयी सुविधांचे व कर्मचारी/ शिक्षक यांच्या विषयीचे व्हिडिओ चित्रीकरण असावे.
४. प्रस्ताव घेतांना ते फक्त DVB-TT-Surekh या फॉन्टमध्येच घेतले जावेत व त्याच फॉन्ट मध्ये शासनास सादर करावेत.

५. याचिका क्र. ६३०७/२०१२ मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. ८.८.२०१२ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत – "Learned AGP and counsel for the University to take instructions in respect of the norms, guidelines framed by the competent authorities, if any in respect of minimum requirement of infrastructural facilities to start colleges, till the management fulfills the criteria laid down in respect of the infrastructural requirement within the stipulated period of five years, as per the State policy." मा. न्यायालयाने दिलेल्या सदर आदेशाच्या अनुषंगाने नवीन व्यावसायीक व पारंपारिक महाविद्यालय, विद्याशाखा, अभ्यासक्रम / विषय व वाढीव तुकडयांचे प्रस्ताव मागवितांना व शिफारस करतांना शासनाच्या दि. ३०.१०.२०१० च्या शासन निर्णयामधील परिशिष्ट 'ब' व 'क' मध्ये सुधारणा करुन एकच परिशिष्ट "ब" विहित करण्यात आले असून यासोबत जोडलेल्या परिशिष्ट "ब", "क" व "ड" ची पूर्तता करणाऱ्या प्रस्तावांचीच शिफारस विद्यापीठांनी करावी.

६. विद्यापीठांनी अर्ज स्विकारतांना व शिफारस करतांना दि. ३० ऑक्टोबर, २०१० च्या शासन निर्णयामधील तरतूदीनूसार कार्यवाही करावी व या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट **" ब", "क"** व **"ड"** मधील निकषांची पूर्तता होत असल्याची खातरजमा करुन त्या पुष्टयर्थ कागदपत्रे अर्जासोबत क्रमवार पध्दतीने जोडण्यात यावीत.

७. बायोटेक्नॉलॉजीच्या नवीन अभ्यासक्रम / विषयांना मान्यता देण्याचे प्रस्ताव वरील नमुद दि. ३०.१०.२०१० च्या शासन निर्णयाप्रमाणे तसेच डॉ. कोळसकर यांनी अशा प्रस्तावांच्या छाननीसाठी जे निकष ठरविले होते त्या निकषांप्रमाणे छाननी करुन केवळ पात्र प्रस्ताव शिफारशीत करावे. सदर निकषांचा तक्ता **"क"** आणि **"ड"** येथे सोबत जोडण्यात येत आहे.

८. या शासन निर्णयाद्वारे शासन निर्णय दि. २५.१०.२०११ निरसीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०९१६१४२६१८१६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(ग. सं. कचरे)**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. कुलगुरु,सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
२. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

३. सर्व विभागीय सहसंचालक, महाराष्ट्र राज्य
४. सर्व कुलसचिव, अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
५. मशि / विशि तील सर्व कार्यासने, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
६. निवडनस्ती मशि ४

## परिशिष्ट 'ब'

संस्थेचे नाव :- विद्यापीठाचे नाव :

ठिकाण :- विद्याशाखा :-

| अक्र. | तपासणी सूची | पुर्ततेचा "तपशिल" (होय/नाही) | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | संस्थेचा नवीन महाविद्यालय मंजूरीसाठीचा विहित नमुन्यात अर्ज | | |
| २ | संस्था नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत | | |
| ३ | महाविद्यालयाची मागणी करण्यापूर्वी संस्थेच्या नोंदणीस किमान एक वर्ष पूर्ण झाले आहे काय? | | |
| ४ | संस्थेच्या घटनेची साक्षांकित प्रत | | |
| ५ | संस्थेचा मागील वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाची साक्षांकित प्रत. | | |
| ६ | किमान रु. ५००००० चे फिक्स डिपॉजिटची प्रमाणित प्रत | | |
| ७ | चालू वर्षाच्या तपशिलवार अंदाजपत्रकाची प्रत | | |
| ८ | संबंधीत संस्थेचे आर्थिक व्यवहार राष्ट्रीयकृत / शेड्युल बँकेमार्फत केले जात असल्याचे कागदपत्र. | | |
| ९ | संबंधित राष्ट्रीयकृत / शेड्युल बँकेमध्ये ठेवलेला ठेव निधी विद्यापीठाच्या पूर्व परवानगी शिवाय न काढण्याबाबतचे संबंधित राष्ट्रीयकृत बँकेचे व संस्थेचे संयुक्त आश्वासन पत्र. | | |
| १० | शासनाचे कायम विना अनुदानित धोरण लक्षात घेता अर्जासोबत महाविद्यालयाचा नियमानुसार वेतन व वेतनेतर खर्च संस्था करणार असल्याबाबतचे रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र | | |
| ११ | १. **स्वत:ची जागा** - अ) "अ" "ब" आणि "क" वर्ग महानगरपालीका क्षेत्रामध्ये १/२ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या कागदपत्रांची प्रमाणित प्रत. | | |
| | ब) "ड" वर्ग महानगरपालीका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्राची प्रमाणित प्रत. | | |
| | क) उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्राची प्रमाणित प्रत. | | |
| | **२. भाडयाची जागा** - अ) "अ" "ब" आणि "क" वर्ग महानगरपालीका क्षेत्रामध्ये १/२ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडे तत्वावर घेतलेल्या "नोंदणीकृत कराराची" प्रत. | | |
| | ब) "ड" वर्ग महानगरपालीका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावे भाडे तत्वावर घेतलेल्या "नोंदणीकृत कराराची" प्रत. | | |
| | क) उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडे तत्वावर घेतलेल्या "नोंदणीकृत कराराची" प्रत. | | |
| १२ | (अ) **इमारत: (स्वत:ची)** - संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था किंवा इतर प्राधिकरणाचे प्रमाणित उतारे. (सोबतच्या प्रपत्र -अ मध्ये सर्वसाधारण वर्गखोली व इतर क्षेत्रफळाचा तपशील जोडला आहे) | | |
| | १) **शैक्षणिक व प्रशासकीय इमारत** | | |
| | १.१ प्राचार्य कक्ष | | |
| | १.२ कार्यालय | | |
| | १.३ इलेक्ट्रॉनिक/संगणक प्रयोगशाळा | | |
| | १.४ रसायनशास्त्र प्रयोगशाळा | | |
| | १.५पदार्थविज्ञान प्रयोगशाळा | | |
| | १.६ जिवशास्त्र प्रयोगशाळा | | |
| | १.७ ग्रंथालय | | |
| | १.८ लेडीज रुम | | |
| | १.९ रेकॉर्ड रुम | | |

**परिशिष्ट 'ब'**

| | | | |
|---|---|---|---|
| | १.१० नॅक रुम | | |
| | १.११ स्टाफ रुम | | |
| | १.१२ सभागृह | | |
| | १.१३ मोठे व्याख्यान कक्ष | | |
| | १.१४ टॉयलेट ब्लॉक | | |
| | १.१५ व्हरांडा | | |
| | १.१६ एन.सी.सी. रुम | | |
| | १.१७ एन.एस.एस. रुम | | |
| | २) २.१ पाणी सुविधा (पाणी पट्टी पावती) | | |
| | २.२ विज सुविधा (वीज देयकाची प्रत) | | |
| | २.३ ड्रेनेज सुविधा (स्थानिक प्राधिकरणाचे नकाशासह प्रमाणपत्र) | | |
| | ३) होस्टेल सुविधा / परिसरात २० टक्के विद्यार्थ्यांची राहण्याची सोय असल्याचे प्रमाणपत्र | | |
| | **“ब”) इमारत भाडयाची : (नोंदणीकृत भाडेकरार)**<br>**(सोबतच्या प्रपत्र -अ मध्ये सर्वसाधारण वर्गखोली व इतर क्षेत्रफळाचा तपशील जोडला आहे)** | | |
| | **१) शैक्षणिक व प्रशासकीय इमारत** | | |
| | १.१ प्राचार्य कक्ष | | |
| | १.२ कार्यालय | | |
| | १.३ इलेक्ट्रॉनिक/संगणक प्रयोगशाळा | | |
| | १.४ रसायनशास्त्र प्रयोगशाळा | | |
| | १.५ पदार्थविज्ञान प्रयोगशाळा | | |
| | १. ६ जिवशास्त्र प्रयोगशाळा | | |
| | १.७ ग्रंथालय | | |
| | १.८ लेडीज रुम | | |
| | १.९ रेकॉर्ड रुम | | |
| | १.१० नॅक रुम | | |
| | १.११ स्टाफ रुम | | |
| | १.१२ सभागृह | | |
| | १.१३ मोठे व्याख्यान कक्ष | | |
| | १.१४ टॉयलेट ब्लॉक | | |
| | १.१५ व्हरांडा | | |
| | १.१६ एन.सी.सी. रुम | | |
| | १.१७ एन.एस.एस. रुम | | |
| | २) २.१ पाणी सुविधा (पाणी पट्टी पावती) | | |
| | २.२ विज सुविधा (वीज देयकाची प्रत) | | |
| | २.३ ड्रेनेज सुविधा (स्थानिक प्राधिकरणाचे नकाशासह प्रमाणपत्र) | | |
| | ३) होस्टेल सुविधा / परिसरात २० टक्के विद्यार्थ्यांची राहण्याची सोय असल्याचे प्रमाणपत्र | | |
| १३ | १२ (अ) व (ब) मधील (१) व (२) साठी फर्निचर किंवा त्यासाठी किमान रु. ५.०० लक्ष शिल्लक. | | |
| १४ | ग्रंथालयात पुस्तकाची सूविधा (किमान ५०० पुस्तके प्रत्यक्षात हवीत) | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | प्रथमत: महाविद्यालय भाडयाच्या इमारतीत सुरु केले जाणार असेल तर प्रथम संलग्नीकरण मिळाल्यापासून ५ वर्षामध्ये महाविद्यालय ज्या ठिकाणासाठी मंजूर झाले आहे त्या ठिकाणी स्वत:चे इमारतीमध्ये स्थलांतरित करत असल्याबाबतचे हमीपत्र. | | |
| १६ | शासन निर्णय क्रमांक एनजीसी - २००९/ (३०१/०९)/मशि - ४, दि. २५/९/२००९ अन्वये ज्या संस्थेची यापूर्वीचे महाविद्यालये अस्तित्वात आहेत अशा संस्थेने नवीन महाविद्यालयाची मागणी केल्यास पूर्वीच्या महाविद्यालयाचे नॅक /एनबीए मुल्यांकन अथवा पुनर्मुल्यांकन असणे आवश्यक आहे. | | |

शासन निर्णय क्रमांक एनजीसी २०१२/(२४७/१२)/ मशि ४, दिनांक : २ सप्टेंबर, २०१३

## प्रपत्र – अ

## परिशिष्ट ब मधील अ.क्र. १२(अ) व (ब) साठी कक्षनिहाय किमान आवश्यक क्षेत्रफळ

| अ.क्र. | कक्षाचे नाव | नग | क्षेत्र प्रति नग | एकूण क्षेत्र | कला/विधी/ शिक्षण शास्त्र | वाणिज्य | विज्ञान | कला + वाणिज्य | कला + विज्ञान | वाणिज्य + विज्ञान | कला, वाणिज्य, विज्ञान |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | प्राचार्य कक्ष | १ | २० x २५ | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० |
| २) | कार्यालय | १ | ३० x २० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| ३) | इलेक्ट्रॉनिक/संगणक प्रयोगशाळा | १ | २० x३० | ६०० | -- | -- | ६०० (०) | -- | ६०० (०) | ६०० (०) | ६०० (०) |
| ४) | रसायनशास्त्र प्रयोगशाळा | १ | ३० x ४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ५) | पदार्थविज्ञान प्रयोगशाळा | १ | ३० x ४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ६) | जिवशास्त्र प्रयोगशाळा | १ | ३० x ४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ७) | ग्रंथालय | १ | २० x ३० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| ८) | एनसीसी रुम | १ | २० x १५ | ३०० | ३०० (०) | ३०० (०) | ३०० (०) | ३०० (०) | ३०० (०) | ३०० (०) | ३०० (०) |
| ९) | एन.एस.एस. रुम | १ | २० x १५ | ३०० | ३०० (०) | ३०० (०) | ३०० (०) | ३०० (०) | ३०० (०) | ३०० (०) | ३०० (०) |
| १०) | लेडीज रुम | १ | १० x १५ | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० |
| ११) | रेकॉर्ड रुम | १ | १० x १५ | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० |
| १२) | नॅक रुम | १ | १० x १५ | १५० | १५० (०) | १५० (०) | १५० (०) | १५० (०) | १५० (०) | १५० (०) | १५० (०) |
| १३) | स्टाफ रुम | १ | २० x ३० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| १४) | सभागृह | १ | ४० x ३० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० |
| १५) | मोठे व्याख्यान कक्ष | ३/६/९ | | ९०० | २७०० | २७०० | २७०० | ५४०० | ५४०० | ५४०० | ८१०० |
| १६) | टॉयलेट ब्लॉक | ४ | १० x १५ | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| १७) | व्हरांडा | १ | किमान ५ फुट रुंद | | २१०० | २४०० | ३३०० | ३००० | ३८०० | ४१०० | ४६५० |
| | **एकूण (किमान आवश्यक क्षेत्रफळ)** | | | **१०२५०** | **९२००** | **९५००** | **१४०००** | **१२८००** | **१७२००** | **१७५००** | **२०७५०** |

## परिशिष्ट 'क'
## पदवी स्तरावर बायोटेक्नॉलॉजी विषय सुरु करण्यासाठी आवश्यक निकष

| अ.क्र. | तपासणी सूची |
|---|---|
| १ | हा विषय सुरु करताना त्या महाविद्यालयात विज्ञान शाखा असणे आवश्यक आहे. |
| २ | सदर महाविद्यालयात विज्ञान शाखा ४ वर्षापूर्वी सुरु झालेली पाहिजे म्हणजेच विज्ञान शाखेची एक बॅच पास असणे आवश्यक आहे. |
| ३ | महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन “अ” श्रेणीचे असणे आवश्यक आहे. |
| ४ | सदर महाविद्यालयातून बायोलॉजीची एक बॅच बाहेर पडली पाहिजे. |
| ५ | या महाविद्यालयात बायोलॉजी, मायक्रोबायोलॉजी, केमेस्ट्री हे विषय पदवी स्तरावर असणे आवश्यक आहे. त्या विषयातील पदवीधारकांची किमान एक बॅच पूर्ण झाली पाहिजे. |
| ६ | भौतिक व मूलभूत सुविधा असणे आवश्यक आहे. |
| ७ | पूर्णवेळ पात्रताधारक शिक्षक असले पाहिजेत. |
| ८ | विद्यापीठ शैक्षणिक अर्हतेप्रमाणे दोन अधिव्याख्याते एम.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी विषयातील व एक एम.एस्सी मायक्रोबायोलॉजी विषयाचा अधिव्याख्याता फूलटाईम पाहिजे. चौथा शिक्षक एम.एस्सी. केमेस्ट्री, सांख्यीकी पाहिजे. प्रस्तुत अधिव्याख्याता पूर्णवेळ नसला तरी चालेल. |
| ९ | सदर महाविद्यालयात दोन प्रयोगशाळा पाहिजेत. |
| १० | विषय सुरु ठेवण्यासाठी महाविद्यालयाची आर्थिक परिस्थिती चांगली असली पाहिजे. |

## परिशिष्ट 'ड'
## पदव्युत्तर स्तरावर बायोटेक्नॉलॉजी विषय सुरु करण्यासाठी आवश्यक निकष

| अ.क्र. | तपासणी सूची |
|---|---|
| १ | मागणी केलेल्या महाविद्यालयात बी.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी हा विषय असला पाहिजे. |
| २ | सदर महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन किमान "अ" श्रेणी असले पाहिजे. |
| ३ | विज्ञान शाखेचे सर्व विषय असणे आवश्यक आहे. |
| ४ | बी.एस्सी बायोटेक्नॉलॉजीचा विभाग तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीचा असला पाहिजे. |
| ५ | तीन पूर्णवेळ व एक अर्धवेळ शिक्षक असणे आवश्यक आहे. |
| ६ | दोन प्रयोगशाळा सहाय्यक असणे आवश्यक आहे. |
| ७ | किमान ६०० वर्ग फूट जागेच्या दोन प्रयोगशाळा असाव्यात. |
| ८ | भौतिक व मूलभूत सुविधा असणे आवश्यक आहे. |